जा.क्र.पिसंयो/उसंपिसं/२०१२-१३/मा.सू.टिओएफ/ ३०४ /१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५.
दि. ०४ / ५/२०१२

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक,
(सर्व)

**विषयः-** प्रवर्तकांचे दिर्घ मुदतीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करणेबाबत...

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन २०१२-१३ मध्ये एकूण १२ प्रवर्तकांचे दिर्घ मुदतीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करावयाचे आहेत. सदर प्रशिक्षण वर्ग मार्गदर्शक सुचनामध्ये नमुद केलेल्या जिल्हयांच्या ठिकाणी विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत आयोजित करण्यात यावे. यासाठी विभागीय कृषि सहसंचालक यांनी आपल्या विभागातील जिल्हानिहाय दर्शविलेले प्रशिक्षणार्थीची निवड करुन त्यांना प्रशिक्षणासाठी हजर राहणेबाबत आदेश निर्गमित करावेत. सदर प्रशिक्षण वर्गासाठी संबंधीत पीक योजनेकडून अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

तरी दिलेल्या लक्षांकाप्रमाणे प्रशिक्षण वर्ग आयोजित करुन ते यशस्वी होतील याबाबत सर्वतो प्रयत्न करावेत ही विनंती.

**सोबत :-** मार्गदर्शक सुचना

संचालक
**विस्तार व प्रशिक्षण**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

## दिर्घ मुदतीचे प्रवर्तकांचे प्रशिक्षण वर्ग (टिओएफ) आयोजित करण्याबाबत मार्गदर्शक सुचना सन २०१२-१३

**पार्श्र्वभूमी :-**

दिर्घ मुदतीचे प्रवर्तकांचे प्रशिक्षण (टि.ओ.एफ.) हा अभिनव उपक्रम सध्या विविध योजनांखाली घेण्यात येत आहे. सोयाबीन, कापूस, भात, तूर व हरभरा ही पिके महाराष्ट्रातील महत्वाची नगदी व अन्नधान्य पिके आहेत. या पिकांची महाराष्ट्राची इतर राज्यांच्या तुलनेत सरासरी हेक्टरी उत्पादकता कमी आहे. त्याचे प्रमुख कारणांपैकी विविध किड/रोगांचा होणारा प्रादुर्भाव हे एक महत्वाचे कारण आहे. राज्यातील किटकनाशकांचा असंतुलीत वापर ही एक समस्या आहे. सातत्याने एकाच प्रकारची किटकनाशके वापरल्यामुळे किडींमध्ये किटकनाशास प्रतिकारशक्ती निर्माण होते. किटकनाशकांच्या अयोग्य वापरामुळे दुय्यम किडींचा अचानक मोठया प्रमाणावर उद्रेक होवून पिकांचे नुकसान होते. या शिवाय किटकनाशकांच्या अतिवापरामुळे हवा, पाणी, जमीन प्रदुषणाबरोबरच जैवसाखळीचे संतुलन बिघडते, विविध प्राणी व मानवावर विपरीत परिणाम होतात. पर्यावरणावर होणारा अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी भारताबरोबरच इतर देशांमध्ये एकात्मिक किड व्यवस्थापन (आय.पी.एम) ही संकल्पना किड/रोग व्यवस्थापनासाठी अगिकारली आहे. रासायनीक किटकनाशकांस पर्याय म्हणून या संकल्पनेत किड नियंत्रणाचे इतर पर्याय जसे भौतिक पर्याय, जैविक पर्याय व व्यवस्थापनेचे पर्याय वापरुन केवळ शेवटचा उपाय म्हणून किटकनाशकांचा वापर केला जातो. किटकनाशकावरील खर्च कमी केल्याने निव्वळ आर्थिक नफा वाढतो. हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतावर अनभवून शेतकर्यांरपर्यंत शेतीशाळा माध्यमातून पोहचविण्यासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण टि.ओ.एफ. (ट्रेनिंग ऑफ फॅसिलेटेटर) उपक्रम घेण्यात येत आहे.

यासाठी दिर्घ मुदतीचे प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (ट्रेनिंग ऑफ ट्रेनर) उपक्रम सन १९९२-९३ पासूनच राज्यात सुरु केला असून तो टि. ओ. टी (TOT) या नावाने प्रचलित होता. हा कार्यक्रम आशियाई विकास बँकेकडून राबविला जात असे. १९९५-९६ नंतर हा कार्यक्रम जागतिक अन्न व कृषि परिषद (FAO) व युरोपियन समुदाय (EU) कडून राबविला गेला. यात प्रवर्तकांचा सहभाग वाढवून यास टिओएफ (Training of Facililator) असे संबोधण्यात आले. सध्या सदर प्रशिक्षणाचे कार्यक्षेत्र व संकल्पना वाढवून आय.पी.एम. ऐवजी एकात्मिक पीक व्यवस्थापन (आय.सी.एम.) संकल्पना राबविण्यात येत आहे. याद्वारे पिकाचे लागवडीपासून काढणी व काढणीपश्चात वापरावयाच्या तंत्रज्ञानाबाबत शेतकर्यांयना मार्गदर्शन करण्यात येते.

**<u>अ) टि.ओ.एफ. प्रशिक्षणांचा उद्देश</u> :-**

१) सध्या अस्तित्वात असलेल्या शासकिय व अशासकिय संस्थांच्या आणि पिक संरक्षण यंत्रणेमधून एकात्मिक पिक व्यवस्थापनासाठी शेतीशाळा चालविण्याकरीता तज्ञ प्रवर्तक/प्रशिक्षक निर्माण करणे.
२) एकात्मिक पिक व्यवस्थापनामध्ये कार्य करणार्यार संस्था, कृषि विद्यापीठे व स्वयंसेवी संस्था इत्यादिचा समन्वय साधणे.
३) प्रशिक्षणार्थींना जैविक किडनाशक उत्पादनाचे तंत्र शिकवून त्यांना उत्पादन व वापरात पारंगत करणे.
४) प्रत्यक्ष शेतावर शेतीशाळा आयोजित करण्यासाठी प्रशिक्षणार्थींमध्ये आत्मविश्र्वास निर्माण करणे.

**<u>ब) टि.ओ.एफ. प्रशिक्षणाचे स्वरुप</u> :-**

टिओएफ प्रशिक्षण शक्यतोवर कृषि विद्यापीठे, संशोधन केंद्रे, कृषि चिकित्सालय इ. ठिकाणी आयोजित करावे. तेथे किमान २.०० हेक्टर प्रक्षेत्रावर विविध प्रयोग घेऊन प्रत्यक्ष शेतावरील अनुभवासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा. प्रती टिओएफ सर्व साधारण ३० प्रशिक्षणार्थी असावेत. प्रशिक्षणार्थींचे ४ लहान गट तयार करुन प्रत्येकी एक प्रशिक्षक (फॅसीलेटटर) एका गटास शिकण्यास मदत करेल. या चार प्रशिक्षकांपैकी एक प्रशिक्षक समन्वयक म्हणून काम पाहील.

http://mahaagri.gov.in

**क) टि.ओ.एफ. प्रशिक्षणाची पध्दती :-**

१) **प्रत्यक्ष सहभाग (Participatory):** प्रशिक्षणार्थी प्रत्येक कृतीत स्वतः सहभागी होवून अनुभवातून शिक्षण घेतील. प्रत्येक गट वेगवेगळया प्रायोगीक क्षेत्रावर निरीक्षणे घेतील व त्यावर दुपारी सहभागरित्या चर्चा करतील.

२) **अनुभवातून शिक्षण (Experiential learning):** प्रक्षेत्र हेच टिओएफ मधील प्रशिक्षणचे खरे साधन आहे. प्रक्षेत्र म्हणजेच पुस्तक असे समजण्यात यावे. प्रक्षेत्रावर पिकांचा अभ्यास करण्यात यावा. साधे प्रयोग जसे एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दत, शेतकर्यांची पारंपारीक पध्दत, मृद परिक्षण, जैविक घटकांचे उत्पादन, पिकाचा तुलनात्मक अभ्यास इ. गटामार्फत केला जावा. ज्या तंत्रज्ञानाची भाषणांतून, वर्तमानपत्रे, पुस्तके, कृषि विद्यापीठे यांच्याकडून नेहमी चर्चा केली जाते असे तंत्रज्ञान कौशल्य प्रत्यक्ष शेतीवर अनुभवावे. त्याद्वारे प्रशिक्षणार्थीमध्ये आत्मविश्र्वास निर्माण करुन पुढे शेतीशाळा घेण्यासाठी चांगले प्रशिक्षक तयार होतील.

३) **संशोधीत दृष्टिकोन (Discovery based):** विविध पिकाच्या वाढीच्या अवस्थेत (पिकांच्या लागवडीपासून काढणीपर्यंत) प्रशिक्षणार्थींनी नियमतीपणे पिकांची निरीक्षणे नोंदवावीत. पिकाच्या वाढीच्या अवस्थेत होणारे बदल व त्याचा पर्यावरणाशी असलेल्या संबंधावर चर्चा करावी. तसेच पिकाचे नैसर्गिक शत्रू तसेच मित्र व शत्रू किडीवर अभ्यास करण्यात यावा.

४) **कृति व कौशल्य (Action and skills):** कमीत कमी वर्ग शिक्षण व बहुतांशी संकल्पना आणि कौशल्ये हे अधिकाधिक रंजकपणे व प्रत्यक्ष कृतिद्वारे शिकविणे अगत्याचे आहे. अशा प्रकारची शिकविण्याची कला ही दूरगामी व परिणामकारक ठरते.

५) सदर प्रशिक्षण हे साचेबध्द नसल्याने प्रशिक्षणार्थी केंद्रबिंदू समजून त्यास नाविन्यपूर्ण शिक्षण द्यावे.

६) प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम स्थानिक गरजांवर आधारित ठेवावा. प्रशिक्षक शेतीशाळेमध्ये गरजेवर आधारित बाबीचा समावेश करण्यास सक्षम व्हावेत यासाठी शेतीशाळेतील शेतकर्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी, समस्यांचे निराकरण, शेतकर्यांमध्येआत्मविश्र्वास वृध्दी, सुसंवाद, संयुक्तरित्या निर्णय घेण्याची क्षमता यावी.

७) गटात काम केल्याने सांघीक/सहकार्याची भावना व व्यवस्थापन कौशल्य वाढीस लागतात.

**ड) टि.ओ.एफ. चा अभ्यासक्रम :-**

टिओएफ प्रशिक्षण सुरु करण्यापूर्वी गरजेनुरुप आणि निवडक शास्त्रज्ञांशी चर्चा करुन सर्व साधारण अभ्यासक्रम व कामाचे वेळापत्रकाचे नियोजन करावे. अभ्यासक्रम तयार करतांना प्रशिक्षण उद्दीष्टे आणि गुणवत्ता दर्शके विचारात घेतली जावीत. अभ्यासक्रमाचा वेळ खालील चार प्रमुख बाबींवर विभागाला जावा.

| अ.क्र. | मुख्य बाब | वेळ | समाविष्ट बाबी |
|---|---|---|---|
| १ | पिक उत्पादन तंत्रज्ञान | ५० टक्के | पिकाचे परिसंस्थेचे विश्लेषण, किटक संग्रहालय |
| २ | गट क्रियाशीलता व गट संघटन कौशल्ये (अनौपचारीक शिक्षण) | ३० टक्के | समन्वय राहण्यासाठी मनोरंजनात्मक सांघीक खेळ घेतले जातात. |
| ३ | शेतीशाळेचे व्यवस्थापन | १० टक्के | कृति आराखडा तयार करणे, शेती दिन ठरविणे, साधनांची जुळवाजुळव अंदाजपत्रक तयार करणे, परिसंस्थेचा आढावा घेणे. |
| ४ | शेतीशाळेचे नियोजन | १० टक्के | प्रत्यक्ष शेतकर्यारच्या शेतावर जाऊन शेतीशाळा चालविण्याचा अनुभव |

अभ्यासक्रम तयार करताना टिओएफ प्रशिक्षण अनुभवी समन्वयक व प्रवर्तक यांनी चर्चा करावी. अभ्यासक्रमाची प्रत जि.अ.कृ.अ., विभागीय कृषि सहसंचालक यांचे मंजूरीसाठी पाठविण्यात यावी.

http://mahaagri.gov.in

**इ) <u>प्रशिक्षणात सर्वसाधारण दैनिक कार्य</u> :-**

टिओएफ प्रशिक्षणाच्या उद्घाटन व समारोप दिवसाशिवाय इतर सर्व दिवशी प्रशिक्षण वर्गाची सर्वसाधारण कामे खालील प्रमाणे ठेवावीत.

१) मागील सत्रातील कामाचा आढावा घेणे.
२) प्रशिक्षण वर्गाची त्या दिवसाची कामे करणे.
३) शेतावरील पिक परिसंस्थेची निरीक्षणे घेणे.
४) पीक परिसंस्था विश्लेषण निरीक्षणानुसार चित्रित करणे, निरीक्षणाचे विश्लेषण करुन त्यावर चर्चा आणि त्या त्या उपगटाने निर्णय घेणे.
५) पीक परिसंस्था विश्लेषण गटनिहाय सादर करणे.
६) पीक परिसंस्था विश्लेषण निष्कर्षानुसार प्रक्षेत्रावरील कार्यवाही करणे.
७) शास्त्रोक्त प्रयोगाची निरीक्षणे घेणे.
८) कीटकांचे संग्रहालय तयार करणे आणि त्यांची निरीक्षणे घेणे.
९) सांघीक मनोरंजनात्मक कार्यक्रम घेणे.
१०) विशेष विषयावर मार्गदर्शन करुन चर्चा करणे.
११) पुढील आठवडयाच्या कामांचे व वर्गाचे नियोजन करणे.
१२) त्या दिवसाच्या कामाचे पुनर्विलोकन करणे.

**फ) <u>अभ्यासातील विषयांची यादी</u> :-**

अभ्यासात प्रामुख्याने पिकाच्या वाणांची निवड, तण व्यवस्थापन लागवड पध्दती, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, विविध किडींचे व्यवस्थापन, विविध रोगांचे व्यवस्थापन, पांढरीमाशी व्यवस्थापन, मित्र शत्रु किडींची ओळख, काढणी व काढणीनंतरचे तंत्रज्ञान, एनपीव्ही, बी.टी. कामगंध सापळे, रोग आणि तण व्यवस्थापन, जैविक किटकनाशके उत्पादन, कृषि परिसंस्थेची संकल्पना, जैविक व रासायनिक किटकनाशकांचा अभ्यास इ. विषयांचा अंतर्भाव करावा.

**ग) <u>सांघिक कौशल्य व गटबांधणी अभ्यास</u> :-**

गटाने प्राप्त समस्याग्रस्त ठिकाणी एकत्रितरित्या कसे काम करावे, सांघिक सहकार्य कसे वाढवावे, संदेश वाहन शीघ्रतेने कसे करावे इ. बाबी मनोरंजनातून शिकवल्या जातात. सांघिक कार्यशीलता ही गटक्रियाशील बनविण्याकरीता पायाभूत घटक आहे यांची जाणीव करुन द्यावी.

**ह) <u>पीक परिसंस्थेचे विश्लेषण (CESA)</u> :-**

यात अन्नसाखळी, जैविक व भौतिक घटकांचा वनस्पतीवर होणारा परिणाम अभ्यासला जावा. दर आठवडयाने पिकावरील परिस्थितीबाबत क्षेत्रीय निरीक्षणे, पिकांची पुननिर्माण क्षमता, किडींच्या आणि त्यांच्या शत्रूंच्या संख्येत होणारे बदल, वातावरणातील घटक यातील परस्पर संबंध विचारात घेवून परिसंस्थेचे विश्लेषण केले जावे. या विश्लेषणाच्या आधारे किड व्यवस्थापनाचे गुणात्मक निर्णय घेण्यात यावेत.

**त) <u>किटक संग्रहालय</u> :-**

प्रशिक्षणात ज्ञानार्जनाचे कुतूहल वाढवून पीकांवरील कीड/रोग यांची व त्यांचे नैसर्गीक शत्रू यांची ओळख पटण्यासाठी महत्वाचा कार्यक्रम म्हणजे किटक संग्रहालय होय. जमवलेल्या किडी व परभक्षी व परजीवी किडींचा जीवनक्रम इत्यादींचा अभ्यास म्हणजे शोधातून शिक्षण घेणे.

http://mahaagri.gov.in

**थ) <u>सराव शेतीशाळा</u> :-**

चार गावात सराव शेतीशाळा घेवून चार गटात शेतीशाळा कशा चालवाव्यात याचा सराव करावा, गावाची निवड करणे, शेतकर्यांचीनिवड करणे, पायाभूत सर्वेक्षण, शेतीशाळेचा अभ्यासक्रम, प्रशिक्षणाची पध्दत इत्यादीबाबत सराव करुन प्रशिक्षणार्थीस शेतीशाळा घेण्याइतपत सक्षम केले जावे.

**द) <u>टि.ओ.एफ. प्रशिक्षणातून अपेक्षीत साध्य</u> :-**

१) प्रशिक्षण प्रत्यक्ष क्षेत्रावर असल्यामुळे प्रशिक्षणार्थीनी तंत्रज्ञान अनुभवाने शिकणे.
२) पिकावरील शत्रुकिडी, मित्रकीडी, रोग तणे यांची ओळख व व्यवस्थापनाबाबत तंत्रज्ञान अवगत करणे.
३) परिसंस्थेच्या अभ्यासामुळे प्रत्यक्ष शेतीवर निर्णय घेण्याची क्षमता प्रशिक्षणार्थीमध्ये येणे.
४) किटक संग्रहालय अभ्यासातून किटकांची ओळख होणे.
५) अनौपचारीक शिक्षणातून व्यक्तीमत्व विकास होऊन सकारात्मक दृष्टिकोन तयार होणे.
६) शेतीशाळा चांगल्याप्रकारे घेता येण्या इतपत आत्मविश्र्वास निर्माण होणे.
७) काही प्रशिक्षणार्थी तज्ञ प्रशिक्षक म्हणून पुढील वर्षी काम करु शकणे.
८) प्रशिक्षणार्थीस संघटन कौशल्य, तंत्रज्ञान अवलंब कौशल्य, सखोल ज्ञान मिळणे.
९) विविध जैविक किटकनाशकांचे उत्पादन व वापर याची माहिती होणे.
१०) प्रशिक्षणार्थी पूर्णवेळ रहात असल्याने त्यास शिक्षणासाठी जास्तीत जास्त वेळ दिला जातो. त्यामुळे प्रशिक्षणार्थी तंत्रज्ञानात परिपूर्ण होतात व शेतीशाळा घेण्यासाठी सक्षम होतात.

**ध) <u>प्रशिक्षणासाठी कर्मचारी निवड</u> :-** टिओएफ प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थीची निवड करताना खालील बाबी पाहाव्यात.

१) कर्मचार्याचे वय ४५ वर्षाआतील असावे.
२) प्रशिक्षणात महिला कर्मचा-यांचाही सहभाग असावा. तथापी, सदर महिला कर्मचा-यांची सक्षमता विचारात घ्यावी व त्यांचेसाठी सुविधांची व्यवस्था करावी.
३) यापुर्वी टिओएफ प्रशिक्षण झालेल्या कर्मचा-याची पुनश्चः निवड करण्यात येवू नये.
४) प्रशिक्षणास कर्मचारी सबळ कारणा शिवाय अुनपस्थित राहील्यास प्रशिक्षणार्थीकडून नियमानूसार प्रशिक्षण खर्च वसूल करावा.
५) प्रशिक्षणास प्रशिक्षणार्थीची निवड करताना प्रशिक्षणार्थी पैकी १० टक्के प्रशिक्षणार्थी कृषि अधिकारी, २० टक्के प्रशिक्षणार्थी कृषि पर्यवेक्षक व उर्वरित ७० टक्के प्रशिक्षणार्थी कृषि सेवक/कृषि सहाय्यक या संवर्गाचे प्रस्तावीत करणे बंधनकारक आहे.

जिल्हानिहाय व पीकनिहाय प्रशिक्षणांसाठी पाठवायच्या प्रशिक्षणार्थीचंी संख्या सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार पाठविण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत नेमुन दिलेल्या संख्येपेक्षा कमी कर्मचारी प्रस्तावित करु नयेत.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत त्या-त्या पिकासाठी संबंधीत जिल्हयातून प्रत्येकी ३० प्रशिक्षणार्थी निवडावेत.

**न) <u>प्रशिक्षण ठिकाण</u> :-** प्रशिक्षणासाठी शक्यतो कृषि विद्यापीठ, कृषि संशोधन संस्था, कृषि चिकीत्सालये, कृषि महाविद्यालये येथे दीर्घ मुदतीच्या प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावेत. तथापि, प्रशिक्षण वर्गासाठी ४ प्रशिक्षक, ३० प्रशिक्षणार्थी यांचे निवास व भोजन व्यवस्था तसेच प्रात्यक्षिकासाठी २ हे. प्रक्षेत्र उपलब्ध असलेली ठिकाणे निवडण्यास हरकत नाही.

http://mahaagri.gov.in

**प) <u>योजना अंमलबजावणी</u> :-** सदर प्रशिक्षण विभागीय कृषि सहसंचालक यांनी आयोजित करावयाचे आहे. यासाठी सुयोग्य ठिकाण, आवश्यक साधन-सुविधा असल्याची त्यांनी खात्री करावी. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षीत झालेल्या टिओएफ समन्वयक व प्रवर्तक यांचे मदतीने प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम व प्रशिक्षणार्थींचे आदेश विभागीय कृषि सहसंचालक यांच्या स्तरावरून काढण्यात यावेत. सदर प्रशिक्षणांसाठी ज्या ठिकाणी प्रशिक्षण होणार आहे त्या उपविभागाचे उपविभागीय कृषि अधिकारी हे प्रशिक्षणाचे संपर्क अधिकारी व संबंधीत जिल्हयाचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी नोडल ऑफिसर म्हणून काम पाहतील.

**फ) <u>नोडल ऑफिसर व संपर्क अधिकारी यांच्या जबाबदार्या</u> :-**

१) प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांची संबधीत कृषि विद्यापीठाचे, के.व्ही.के., कृषि चिकित्सालये, रामेती येथे वसतीगृह, क्लासरुम, प्रक्षेत्र, वाहनव्यवस्था, भोजनव्यवस्था व इतर राहणेच्या दृष्टीने अनुंषगींक सर्व व्यवस्था असल्याची खात्री करणे. नसल्यास, त्याबाबत पर्यायी व्यवस्था तांतडीने करणे, जेणेकरुन प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांना वर्ग सुरु करण्यामध्ये अडचणी येणार नाहीत.

२) प्रशिक्षणाचे ठिकाणी प्रशिक्षकांच्या चमूस प्रशिक्षण वर्गाच्या दैनंदिन व्यवस्थेसाठी आपल्या कार्यक्षेत्रामधील वाहनांपैकी सुस्थितीतील एक वाहन इंधन व चालकासह प्रशिक्षणवर्ग पूर्ण होईपर्यंत उपलब्ध देणे.

३) नोडल अधिकारी यांनी संपर्क अधिकारी, प्रशिक्षक व विद्यापीठांचे संबधीत अधिकारी यांच्या संपर्कात राहून व प्रत्यक्ष भेटी देऊन प्रशिक्षण वर्गाविषयीच्या प्रगतीविषयी आढावा घेणे.

४) संपर्क अधिकारी यांनी दर सोमवारी प्रशिक्षण वर्गास भेट देऊन प्रशिक्षण वर्ग सूरळीत चालण्यासाठी कोणत्याही प्रकारची तांत्रीक व आकस्मिक स्वरुपाच्या उद्भवणार्याि अडचणीचे तात्काळ निराकरण त्यांचे स्तरावर करावे.

५) या प्रशिक्षण वर्गासाठी उप-विभागीय कृषि अधिकारी तथा संपर्क अधिकारी हे अर्थीक जबाबदारी सांभाळतील. आर्थिक कारणाकरीता प्रशिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येणारं नाही याची दक्षता त्यांनी स्वतः घ्यावी. याकरीता त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या संदर्भात विहीत लेखाविषयक सर्व कामे पहावीत. प्रशिक्षणवर्गाच्या नियुक्त समन्वयकांच्या (कोऑर्डीनेटर) मागणीनुसार अनुदानाची उपलब्धता वेळेवर करुन देणेची दक्षता घ्यावी. तथापी, आहरणाबाबतची कोणतीही कृती करण्याआधी या प्रशिक्षण वर्गासाठी आवश्यक असलेल्या बाबीचा अंदाजपत्रकानुसार अभ्यास करावा व आहरणानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची कार्योत्तर मान्यता घ्यावी.

६) संपर्क अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गाचे ठिकाणी प्रिंटरसह एक संगणक, उपलब्ध करुन देणे. तसेच प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणाच्या ठिकाणी पूर्णवेळ संगणकावर काम करणारा लिपीक संवर्गाचा एक कर्मचारी व एक शिपाई अधिग्रहीत करुन उपलब्ध करुन देण्यात यावा.

७) प्रशिक्षणवर्गाच्या कालावधीत तज्ञ प्रतिनीधी मार्गदर्शनासाठी ज्या ज्या वेळेस भेट देतील त्या त्या वेळेस तसेच आयुक्तालय स्तरावरुन वरीष्ठ अधिकारी भेटीसाठी येतील त्यांचेसाठी वाहन व्यवस्था व विद्यापीठाचे ठिकाणी निवास व्यवस्था समन्वयकाच्या सहाय्याने संपर्क अधिकारी यांनी करावी.

८) नोडल अधिकारी यांनी प्रशिक्षणवर्गास नियमीत तथा दर पंधरवडयास भेटी देऊन उपस्थित होणा-या अडचणींचे निवारण तात्काळ करावे. तसेच प्रशिक्षण वर्गाच्या प्रगतीविषयक दरमहा प्रगती अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

९) टीओएफ प्रशिक्षण कालावधीमध्ये दिलेल्या मागदर्शक सुचनांमध्ये दिलेल्या मापदंडानुसार खर्च करावयाचा असून, बाबीअंतर्गत कमी जास्त होणा-या खर्चाचे प्रमाण कोणत्याही परिस्थितीत दिलेल्या एकूण प्रशिक्षण अनुदानापेक्षा जादा करता येणार नाही. तसेच काही बाबींवरील अनुदानात बदल आवश्यक असल्यास योग्य त्या समर्थनासह प्रस्ताव आयुक्तालयास संबंधीत योजना राबविणा-या कार्यासनाकडे मंजूरीसाठी पाठवावा. टिओएफ खर्चाचे मापदंड योजनांतर्गत मंजूरीनुसार राहतील.

http://mahaagri.gov.in

१०) प्रशिक्षण कालावधीमध्ये राज्यांतर्गत करावयाच्या अभ्यास दौरा कार्यक्रमाचे नियोजन करुन किमान १५ दिवस आगाऊ आयुक्तालयाच्या मान्यतेसाठी अंदाजीत खर्चासह पाठवावा.

११) टीओएफ प्रशिक्षणसाठी निवड केलेले समन्वयक व प्रवर्तक हे १५ दिवसापैक्षा जास्त कालावधीचा खंडीत कालावधी (ब्रेक पिरियड) असल्यास त्यांना त्यांचे मुंख्यालयासाठी कार्यमुक्त करण्यात यावे. जर खंडीत कालावधी १५ दिवसापैक्षा कमी असल्यास त्यांनी टीओएफचे पुढील नियोजनासाठी संपर्क अधिकारी यांचे बरोबर काम पहावे. समन्वयक व प्रर्वतक कार्यमुक्त झाले असल्यास त्यांनी किमान तीन दिवस आगोदर त्यांचे टीओएफला कार्यक्रम नियोजनासाठी हजर व्हावे.

१२) टीओएफ प्रशिक्षणसाठी असलेला इंधनावरील खर्च व आकस्मिक खर्च टीओएफ व्यतिरिक्त उपविभागाच्या इतर कार्यक्रमासाठी वापरु नये. मात्र, टीओएफ प्रशिक्षणाच्या अनुषंगाने दौरा असल्यास उपविभागीय अधिकारी यांनी त्याचा वापर करावा.

१३) टीओएफ समन्वयक व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रशिक्षणासाठी आवश्यक आग्रीम समन्वयकास त्याचे मागणी प्रमाणे देण्यात यावा व असा अग्रीम देतांना उपविभागातील अन्य कृषि अधिकारी अथवा कृषि पर्यवेक्षक यांचे मार्फत न देता थेट समन्वयकास देण्यात यावा व यासाठी खर्चाच्या सर्व बाबींच्या तांत्रिक मान्यता प्रधान करण्यात याव्यात.

१४) टीओएफ प्रशिक्षणासाठी लागणारे तांत्रिक साहित्य योग्य त्या गुणवत्तेचे व लेखा पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावे. यासाठी समन्वयक,प्रर्वतक व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी समिती गठीत करुन समितीने एकत्रित रित्या प्रशिक्षण साहित्य खरेदी करावे.

१५) टीओएफ प्रशिक्षणर्थी समन्वयक यांचे प्रशिक्षण कालावधीतील भत्ते व मानधन प्रशिक्षण कालावधी पूर्ण झालेनंतर तात्काळ देण्याची व्यवस्था करण्यात यावी. यामध्ये अनावश्यक विलंब टाळावा.

१६) टीओएफ प्रशिक्षणार्थीची प्रवासभत्ता देयक उपलब्ध अनुदानानुसार व देयक प्राप्त झालेल्या तारखांच्या क्रमानुसार देण्यात यावे. याबाबत कोणतीही तक्रार होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१७) टीओएफ प्रशिक्षण व शेतीशाळा कार्यक्रमास स्थानिक लोक प्रतिनिधी आमदार खासदार यांना निमंत्रित करण्यात यावे. सदर कार्यक्रमास प्रसिध्दी देण्यात यावी.

१८) टीओएफ प्रशिक्षणासाठी कृषि विद्यापीठे केव्हीके यांचा सहभाग घेण्यात यावा. तसेच त्या त्या पिकाचे पैदासकार (ब्रिडर) व अन्य तज्ञ व्यक्तीनां मार्गदर्शनासाठी बोलवावे.

१९) विभागीय कृषि सह संचालक यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या टीओएफ साठी संबंधीत उपविभागास आकस्मिक खर्चासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच त्यांनी त्यांचे दौ-याचे वेळी प्रशिक्षणास उपस्थितीत राहून मार्गदर्शन करावे.

**भ) <u>योजनेसाठी अनुदान</u> :-** आयुक्तालय स्तरावरून टिओएफ प्रशिक्षणासाठी जिल्हानिहाय व योजनेनिहाय लक्षांक देण्यात येईल. सदर लक्षांकांच्या अनुषंगाने व टिओएफ प्रशिक्षणासाठी देय असलेल्या मानकानुसार अनुदान संबंधीत जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना विभागीय कृषि सहसंचालक यांच्याद्वारे देण्यात येईल. सदरचे अनुदान जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी संपर्क अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी यांना त्वरीत उपलब्ध करुन द्यावे. टिओएफ समन्वयकाच्या आवश्यकतेनुसार सदरचे अनुदान टिओएफसाठी कृषि उपविभागीय अधिकारी यांनी काढून द्यावे.

**म) <u>टिओएफ प्रशिक्षण दौरा</u> :-** टिओएफ प्रशिक्षण अभ्यास दौर्यामिध्येदिलेल्या अनुदानाच्या अधीन राहून महाराष्ट्रामध्येच दौरा आयोजित करण्यात यावा. अभ्यास दौर्यामध्ये संशोधन संस्था, इतर टिओएफ ठिकाणे, कृषि महाविद्यालये किंवा प्रगतशील शेतकर्यांचे शिवारास भेटीकरीता समावेश करण्यात यावा.

http://mahaagri.gov.in

**स) <u>टिओएफ प्रमाणपत्र</u> :-** टिओएफमध्ये प्रशिक्षणार्थींना दिल्या जाणा-या प्रमाणपत्रांवर विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या स्वाक्षर्या ध्याव्यात. प्रमाणपत्र लॅन्डस्केप ए-४ साईजमधील कलरमध्ये ग्लेझ्ड् पेपरवर तयार करण्यात यावेत. प्रमाणपत्राचा नमुना यापूर्वीप्रमाणेच ठेवावा.

**फ) <u>टिओएफ अहवाल</u> :-** प्रशिक्षण सुरू असलेच्या कालावधीत दर सत्रात प्रशिक्षणार्थींचा उपस्थिती अहवाल व प्रगतीचा अहवाल जिल्हा, विभाग व आयुक्तालय स्तरावर पाठविण्यात यावा. याशिवाय प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर एक आठवडयाच्या आत टिओएफ समन्वयकाने टिओएफ प्रशिक्षणाचा अहवाल जिल्हा, विभाग व आयुक्तालय स्तरावर सादर करण्यात यावा.

उपरोक्तनुसार संबधीत नोडल ऑफिसर व संपर्क अधिकारी यांनीत्यांचेवर सोपविलेल्या जबाबदा-या पार पाडव्यत व सदरहू महत्वाकांक्षी प्रशिक्षण वर्ग यशस्वीरित्या पूर्ण होईल असे पहावे.

**संचालक**
**विस्तार व प्रशिक्षण,**
**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे - ५.**

-----------------------

जा.क्र.पिसंयो/उसंपिसं/वि.प्र.०७/मा.सू.टिओएफ/ ३०९ /१२
कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे – ५, दि. ९/५/२०१२

**प्रति,**

१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२) उप-विभागीय कृषि अधिकारी

**प्रत - संचालक (विस्तार)**

१) मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
२) डॅा.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
३) डॅा. बाळासाळेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली, रत्नागिरी
४) विभागीय कृषि सहसंचालक सर्व यांना माहितीसाठी.
५) श्री. कोऑर्डीनेटर फॅसीलीटेटर व्दारा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

**<u>टिओएफ प्रशिक्षण कार्यक्रम</u> :-**

सन २०१२-१३ करीता खालील प्रमाणे टिओएफ कार्यक्रम आयोजीत करण्यात आले आहेत.

| विभाग | जिल्हा | पिकाचे व योजनेचे नांव | | | | प्रशिक्षणार्थी संख्या (३० प्रशिक्षणार्थी/ टीओएफ) | जिल्हानिहाय निवड करावयांच्या प्रशिक्षणार्थीची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कापूस का.वि. कार्यक्रम (रु.१० लाख/ टीओएफ) | सोयाबीन ग.धा.वि. कार्यक्रम (रु.५ लाख/ टीओएफ) | भुईमुग ग.धा.वि. कार्यक्रम (रु.५लाख/ टीओएफ) | मका तृ.धा.वि. कार्यक्रम (रु.५ लाख/ टीओएफ) | | |
| पुणे | अहमदनगर | -- | १ | -- | १ | ६० | प्रती टीओएफ सोलापूर-५, अ.नगर-१०, पुणे-५, सांगली-५, सातारा-५ |
| नाशिक | जळगांव | १ | -- | १ | -- | ६० | प्रती टीओएफ नाशिक-५, धुळे-५, जळगांव-५, नंदूरबार-५, औ.बाद-५, जालना-५ |
| औरंगाबाद | औरंगाबाद | -- | १ | -- | १ | ६० | प्रती टीओएफ औ.बाद-१०, जालना-५, बीड-५, परभणी-५, नांदेड-५ |
| लातूर | लातूर | -- | १ | -- | -- | ३० | लातूर-१०, उस्मानाबाद-५, परभणी-५, हिंगोली-५,नांदेड-५ |
| | परभणी | १ | -- | -- | -- | ३० | लातूर-५, उस्मानाबाद-५, परभणी-१०, हिंगोली-५,नांदेड-५ |
| अमरावती | अमरावती | -- | १ | --- | -- | ३० | अमरावती-१०,यवतमाळ-५, नागपूर-५, भंडारा-५,वर्धा-५ |
| | अकोला | १ | -- | -- | -- | ३० | अकोला-१०, बुलढाणा-०५, वाशीम-०५, अमरावती-१० |
| | यवतमाळ | १ | -- | -- | -- | ३० | यवतमाळ-१०, वर्धा-१०, चंद्रपुर-५, नागपूर -०५ |
| नागपूर | नागपूर | -- | १ | -- | -- | ३० | वर्धा-१०, चंद्रपुर-१०, नागपूर-५, भंडारा -०५ |
| **एकूण (१२ टिओएफ)** | | **०४** | **०५** | **0१** | **०२** | **३६०** | |

वरीलप्रमाणे जिल्हयासमोर दर्शविलेल्या प्रशिक्षणार्थीची संख्येनुसार प्रशिक्षणार्थी टिओएफ प्रशिक्षणास उपलब्ध करुन त्यांचे आदेश विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्या-त्या हंगामाकरीता काढावेत.

http://mahaagri.gov.in